ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ६० • गुरुवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

पुणे हल्ला प्रकरणी आरोपींना सहा दिवसांची कोठडी

गुंडगिरी खपवून घेणार नाही;मुख्यमंत्र्यांचे कठोर कारवाईचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-पुण्यातील शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रवेश द्वाराबाहेर भरदिवसा मंदार किवळे याच्यावर गोळीबार प्रकरणातील सहा आरोपींना न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, पुणे आणि मुंबईतील गोळीबाराच्या घटनांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली असून, राज्यात गुंडगिरी आणि दहशत खपवून घेतली जाणार नाही. आरोपींवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कारवाई करा, असे आदेश त्यांनी पोलिसांना दिले आहेत, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

मंगळवारी (२५ नोव्हेंबर) शिवाजीनगर येथील न्यायालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर सहा जणांच्या टोळक्याने मंदार किवळे याच्यावर आधी गोळीबार केला. गोळीचा नेम चुकल्यानंतर आरोपींनी त्याचा पाठलाग करून कोयत्याने सपासप वार केले. या हल्ल्यात किवळेचे दोन्ही हात गंभीर जखमी झाले असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता, सरकारी पक्षाने हत्येचा कट, हल्ल्यासाठी वापरलेली शस्त्रे, वाहने आणि अन्य पुराव्यांच्या तपासासाठी दहा दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, २०२५ मध्ये कात्रज परिसरात झालेल्या शुभम चव्हाण हत्या प्रकरणाचा बदला घेण्यासाठी हा हल्ला करण्यात आल्याचा संशय आहे. शुभमचा भाऊ अक्षय चव्हाण याने अन्य तरुणांना सोबत घेऊन हल्ल्याचा कट रचल्याची माहिती समोर आली आहे. जामिनावर बाहेर आलेल्या मंदार किवळेवर पाळत ठेवून हल्ला करण्यात आल्याचा पोलिसांना संशय असून, हल्ल्यासाठी पिस्तूल आणि कोयते कोठून आणले, याचा तपास सुरू आहे.या घटनेची न्यायालयानेही गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाच्या प्रवेश द्वाराबाहेरच भरदिवसा जीवघेणा हल्ला झाल्याने न्यायालयीन परिसराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुणे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना न्यायालयात पाचारण करून सुरक्षाव्यवस्थेबाबत चर्चा केली. न्यायालयात दररोज वकील, पक्षकार, कर्मचारी आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे अशा संवेदनशील ठिकाणी सुरक्षेच्या त्रुटी राहू नयेत, याबाबत उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. दरम्यान, याच दिवशी मुंबईतील माहिम परिसरात एका ज्वेलर्सच्या दुकानावर दोघांनी गोळीबार केल्याची घटनाही घडली. एकाच दिवशी राज्यातील दोन प्रमुख शहरांत गोळीबाराच्या *पान ४ वर*

खा.शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना प्रकृती अस्वस्थ झाल्याने पुन्हा एकदा मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नियमित तपासणीसाठी ते रुग्णालयात गेले असता डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीची पाहणी करून त्यांना रुग्णालयात दाखल करून घेतले. डी-हायड्रेशनचा त्रास जाणवत असल्याची माहिती खा.सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. पवार यांना रुग्णालयात दाखल केल्याचे समजताच सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची सुरू असलेली महत्त्वाची बैठक सोडून तातडीने रुग्णालय गाठले. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



सुप्रिया सुळे यांनी आपल्या व्हॉट्सप स्टेटसद्वारे शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली. 'बाबांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डी-हायड्रेशन झाल्यासारखे वाटत आहे. त्यांनी थोडे हळू जायला हवे आणि प्रवास कमी करायला हवा. बाबा काहीच ऐकत नाहीत. त्यांना त्यांचे काम प्रचंड आवडते. तुम्ही करत असलेल्या सर्व काळजी बद्दल धन्यवाद,' असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे पवार यांना सध्या विश्रांतीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसची आज महत्त्वाची बैठक सुरू होती. *पान ४ वर*

राज्यातील कायदा-सुव्यवस्था रसातळाला-खा.संजय राऊत

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील वाढत्या हत्या, गोळीबार, अपहरण आणि खंडणीखोरीच्या घटनांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे. मात्र, गृहमंत्री फिती कापण्यात व्यस्त आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

पुण्यात न्यायालयाबाहेर झालेला गोळीबार आणि



मुंबईतील माहिम येथे ज्वेलर्सच्या दुकानावर झालेल्या गोळीबाराचा उल्लेख करत राऊत यांनी सरकारला जाब विचारला. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून राज्यात तुमचेच सरकार आहे, मग गुन्हेगारीला जबाबदार कोण? पोलिसांचे काम केवळ विरोधकांना नोटिसा पाठविण्यापुरतेच राहिले आहे का, असा सवाल त्यांनी केला.भाजपकडून गुंडांना राजकीय आश्रय दिला जात असून, गुंडांच्या मदतीने निवडणुका जिंकल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ठाण्यातील हत्या प्रकरणावरून मुख्यमंत्र्यांनाही त्यांनी लक्ष्य केले. तसेच, विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती होण्याची वाट न पाहता विरोधकांनी जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवावा, असा सल्लाही राऊत यांनी दिला.

गावठी पिस्टल बाळगणाऱ्या दोन जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-गावठी पिस्टल व काडतुस जवळ बाळगणाऱ्या दोन जणांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी मालटेकडी उड्डाणपुलाखालून बुधवारी अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप जाधव, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, फौजदार बळीराम दासरे, फौजदार माधव केंद्रे व पोलीस कर्मचारी हे बुधवारी विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत गस्त घालीत असतांना त्यांना खबऱ्याने माहिती दिली की, माळटेकडी उड्डाण पुलाजवळ दोन तरुण गावठी पिस्टल विक्रीसाठी आलेले आहेत. त्यानंतर लगेच सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी माळटेकडी उड्डाणपुलाखाली सापळा रचून सर्वेश सतीश मुदीराज (वय २४) रा.सुंदरनगर, नांदेड, प्रितम उर्फ बबलू लाला, आनंद लोखंडे (वय २२) रा.संघसेननगर यांना



अटक केली. त्यांच्या जवळून पोलीसांनी एक पिस्टल व एक जीवंत काडतुस असा ३६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीस तपासात दोन्ही आरोपींनी गावठी पिस्टल व काडतुस अजय ताटे रा.संघसेननगर, नांदेड याच्याकडून बेकायदेशिररित्या खरेदी केल्याचे सांगितले आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात तीन आरोपी विरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.



भारतीय संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर सामूहिक संविधानाचे वाचन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी खा.अशोक चव्हाण, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभापती वीरेंद्रसिंघ गाडीवाले, सदिच्छा सोनी पाटील, किशोर भवरे, बाळू राऊत,साहेबराव गायकवाड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

धोकादायक वीजतारांच्या प्रश्नावर सत्ताधारी नगरसेवकांचे महावितरण कार्यालयासमोर उपोषण

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील प्रभाग क्र.१२ मधील धोकादायक विद्युत तारा, जीर्णविद्युत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, या समस्यांच्या सोडवणुकीसाठी चक्क सत्ताधारी गटातील नगरसेवक व नगरसेवक प्रतिनिधींनाच आमरण उपोषणाची हत्यार उपसावे लागले आहे. नगरसेवक सुमंत कांबळे, नगरसेविका प्रतिनिधी बसवराज धाडे व नाना मोरे यांनी दि.२५ नोव्हेंबर पासून महावितरण कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.

निवडणुकीच्या वेळी नागरिकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता आणि प्रभागातील मूलभूत समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी सत्ताधारी लोकप्रतिनिधींनाच आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. प्रभाग क्र.१२ मधील क्रांतीनगर, आंबेडकर नगर, रामपूर रोड, शिवनेरी परिसरासह विविध भागात विद्युत तारा खाली लोंबकळत आहेत. काही ठिकाणी विद्युत पोलची अवस्था धोकादायक झाली असून, रस्त्याच्या मध्यभागी असलेले पोल नागरिकांसाठी अडथळा ठरत आहेत. या धोकादायक विद्युत यंत्रणेमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. याबाबत महावितरणकडे यापूर्वी वारंवार लेखी व तोंडी निवेदने देऊनही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. धोकादायक वीजतारांची तातडीने दुरुस्ती करावी. आवश्यक ठिकाणी नवीन विद्युत पूल उभारावेत, रस्त्याच्या मध्यभागी असलेले अडथळादायक पोल स्थलांतरित करावेत तसेच संपूर्ण प्रभागातील विद्युत यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशा प्रमुख मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत. निवडणुकीच्या काळात नागरिकांना दिलेली आश्वासने प्रतीक्षात उतरविण्याची वेळ आली असताना, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्रलंबित राहणे ही गंभीर बाब असल्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे. बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू झालेले हे उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरू होते या मागण्याबाबत केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही, असा तिघांनी ठाम निर्धार व्यक्त केला.

संविधानाच्या जयघोषात नांदेडमध्ये भव्य संविधान रॅली

संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन;विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय संविधानातील मूल्यांचा प्रसार, नागरिकांमध्ये लोकशाही विषयी जाणीव आणि संविधानाने दिलेल्या अधिकार व कर्तव्यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने येथील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने संविधान दिनानिमित्त शहरात भव्य संविधान रॅली काढण्यात आली.

या रॅलीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचनही करण्यात आले.रॅलीच्या प्रारंभी सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास, तर जिल्हा समाजकल्याण अधिकारी रेखा शेंडगे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शिवानंद मिनगीरे आणि रेखा शेंडगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते शिवाजीनगर, कलामंदिर, पोलीस अधीक्षक कार्यालय चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीताची धून सादर केली.यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटनांपैकी एक असून, जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने संविधानाचा अभ्यास करावा. संविधानाने दिलेले अधिकार समजून घेतानाच त्यातील कर्तव्यांचेही प्रामाणिकपणे पालन करावे, असे आवाहन केले. त्यानंतर उपस्थितांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. रॅलीत पोलीस बँड पथकाने देशभक्तिपर गीतांच्या धून सादर करून



उत्साह निर्माण केला. या रॅलीत मदर टेरेसा नर्सिंग स्कूल, सहयोग कॅम्पस, सिडको येथील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नांदेड आदर्श विद्यालय, टिळकनगर येथील विद्यार्थी व शिक्षक, स्काऊट-गाईड, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, बार्टीचे समतादूत, विविध महामंडळांचे कर्मचारी, कार्यकर्ते, *पान ४ वर*

गाडेगाव रोडवर अज्ञात इसमाचा खून

नांदेड/प्रतिनिधी-गाडेगाव ते त्रिकुट रोडवर एका अज्ञात इसमाचा खून केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली आहे.

अज्ञात इसमावर आरोपींनी तिक्ष्ण हत्याराने वार करुन त्याचा खून करण्यात आला. नंतर त्याचे प्रेत आसना नदीत टाकुन देण्यात आले. बुधवारी सकाळी ही घटना उघडकीस आली आहे. घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे यांनी भेट देवून पाहणी केली. या प्रकरणी बारड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील मयत हा ३५ वयोगटातील असून अद्यापही त्याची ओळख पटली नाही.

न्यायालयाच्या दारातच कायद्याला आव्हान

पुणे म्हटले की, डोळ्यांसमोर उभे राहते ते महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर आणि शिक्षणाची पंढरी असलेले शहर. ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरेचा मोठा वारसा पुण्याला लाभला आहे. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकांच्या विचारांनी समृद्ध झालेल्या या शहराने महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे. मुंबई पाठोपाठ पुण्यात औद्योगिकीकरणाने वेग घेतला. माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग आणि रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध झाल्याने देशाच्या कानाकोपऱ्यातून तरुणाईचा ओघ पुण्याकडे वळला. मात्र, विकासाच्या या वेगवान प्रवासात पुण्याची आणखी एक ओळख निर्माण होत आहे आणि ती म्हणजे वाढती गुन्हेगारी! चड्डी गँग, कोयता गँग, अमली पदार्थांची तस्करी आणि टोळीयुद्ध यामुळे पुण्याच्या लौकिकाला काळिमा फासला जात आहे. एकेकाळी संस्कृती आणि विद्येची ओळख असलेल्या पुण्याला आता गुन्हेगारीतही उणे राहायचे नाही, असेच चित्र दिसत आहे. पुण्यातील शिवाजीनगर परिसरातील न्यायालयात बुधवारी घडलेली घटना तर कायदा आणि सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडविणारी आहे. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मारुती मंदार किवळे हा एका कामानिमित्त न्यायालयात आला होता. तो स्वतः एका खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी असून जामिनावर किंवा पॅरोलवर बाहेर असल्याची माहिती आहे. ज्या व्यक्तीचा त्याने खून केला होता, त्या व्यक्तीच्या भावाने न्यायालयाच्या परिसरातच त्याला गाठले. सुरुवातीला गोळीबार करून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. गोळीबारातून तो बचावल्यानंतर हल्लेखोराने त्याच्यावर कोयत्याने जीवघेणे वार केले. भरदिवसा आणि न्यायालयाच्या दारात घडलेल्या या थरारक घटनेने पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. वास्तविक पाहता न्यायालय ही सर्वसामान्य नागरिकांसाठी न्यायाची आशा असते. अन्याय झाला, अत्याचार झाला किंवा एखाद्या गुन्ह्याला बळी पडावे लागले तर न्याय मागण्यासाठी माणूस न्यायालयाचे दार ठोठावतो. न्यायालयाच्या आवारात आपण सुरक्षित आहोत, आपल्याला न्याय मिळेल, अशी त्याची भावना असते. परंतु, ज्या न्यायालयाच्या परिसरात कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याची अपेक्षा आहे, त्याच ठिकाणी गोळीबार आणि कोयत्याने हल्ला होत असेल तर सामान्य माणसाने सुरक्षिततेची अपेक्षा तरी कोणाकडून करायची? गुन्हेगारांना न्यायालयाच्या दारातही कायद्याची भीती वाटत नसेल तर ही बाब केवळ पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी नाही, तर संपूर्ण व्यवस्थेसाठी चिंतेचा विषय आहे.पुण्यात कोयता गँगचा धुमाकूळ हा काही आजचा विषय नाही. किरकोळ वादातून रस्त्यावर कोयते नाचविणे, वाहनांची तोडफोड करणे, दुकानदारांना धमकावणे, भरवस्तीत मारहाण करणे अशा घटना वारंवार समोर येत आहेत. अमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई अडकत असल्याच्या बातम्याही चिंताजनक आहेत. टोळ्यांमधील वर्चस्वाची लढाई, पूर्ववैमनस्य आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींमधील संघर्ष यामुळे शहरातील शांतता धोक्यात येत आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही की काय?, असा प्रश्न निर्माण होतो.पुणे हे एकट्या शहराचे उदाहरण नाही. राज्यातील मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड यांसह अनेक शहरांमध्ये कमी-अधिक प्रमाणात गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसतात. खून, दरोडे, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, अमली पदार्थांची विक्री आणि टोळीयुद्ध यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. गुन्हा घडल्यानंतर पोलिसांकडून तपास सुरू होतो, आरोपी पकडले जातात, काही दिवस चर्चा होते; परंतु पुन्हा दुसरी घटना घडते. त्यामुळे केवळ गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक सतर्क आणि कठोर होण्याची गरज आहे. गुन्हेगारी टोळ्यांचे जाळे उद्ध्वस्त करणे, अवैध शस्त्रांचा पुरवठा रोखणे, अमली पदार्थांच्या व्यापारावर कठोर कारवाई करणे आणि सराईत गुन्हेगारांवर सातत्याने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. न्यायालयीन परिसरासारख्या संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत केली पाहिजे. त्याचबरोबर राजकीय हस्तक्षेपातून गुन्हेगारांना मिळणारे अभय संपुष्टात आणले पाहिजे. गुन्हेगार कोणत्याही पक्षाचा, गटाचा किंवा प्रभावशाली व्यक्तीचा निकटवर्तीय असला तरी त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे आणि कायद्याचा सन्मान करणारे राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यात सामान्य माणसाला निर्भयपणे जगता आले पाहिजे. रस्त्यावरून चालताना, घराबाहेर पडताना किंवा न्यायालयात जातानाही जीवाची भीती वाटत असेल तर विकासाच्या गप्पांना काय अर्थ उरतो? शहरांचा विकास केवळ उंच इमारती, रुंद रस्ते, मेट्रो आणि औद्योगिक प्रकल्पांनी मोजता येत नाही. त्या शहरातील नागरिक किती सुरक्षित आहेत, कायद्याचा धाक किती आहे आणि सामान्य माणसाला किती निर्भयपणे जगता येते, यावरच खऱ्या विकासाचे मोजमाप व्हायला हवे.पुण्याची ओळख ज्ञान, संस्कृती आणि प्रगत विचारांची आहे. ती गुन्हेगारीच्या सावटाखाली दबली जाता कामा नये. न्यायालयाच्या दारातच गोळ्या झाडल्या जात असतील आणि कोयते चालविले जात असतील तर हा केवळ एका शहराचा प्रश्न राहत नाही, तर राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न बनतो. सरकारने आणि पोलीस यंत्रणेने या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. अन्यथा उद्या पुणे हे शिक्षणाची पंढरी म्हणून नव्हे, तर गुन्हेगारीचे माहेरघर म्हणून ओळखले जाईल, अशी भीती नाकारता येणार नाही. पुणे राहिले नाही गुन्हेगारीत उणे, ही उपरोधिक ओळख पुसून पुन्हा एकदा सुरक्षित, सुसंस्कृत आणि शांत पुणे घडविण्याची जबाबदारी शासन आणि प्रशासनाची आहे.



भारतीय संविधानाचा सर्वव्यापी वैचारिक आशय व गाभातत्त्वे

प्रा.डॉ.ज्ञानेश्वर डिगोळे
पदव्युत्तर इंग्रजी विभाग,
पीपल्स कॉलेज,नांदेड.

भारतीय संविधान हे आधुनिक भारताचे 'व्हिजन डॉक्युमेंट' असून देशातील सर्व कायद्याचे उगमस्थान व मुलाधार आहे. एक महत्त्वाचा राजकीय, प्रशासकीय आणि वैधानिक दस्तावेज असण्याबरोबरच ते भविष्यकालीन शासन, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारणाची दिशा व गंतव्याचे सूचन करणारा मार्गदर्शक दस्तावेजही आहे. भारतासारख्या बहुविधतेने नटलेल्या देशात लोकशाही शासन प्रणाली टिकवण्यात, यशस्वी करण्यात भारतीय संविधानाची भूमिका सुरक्षा कवचासारखी आहे, असे म्हणता येईल. याचे बहुतांशी श्रेय भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सारख्या थोर ध्येयवादी, दूरदृष्टीच्या नेत्यांना जाते. अमेरिकेच्या इतिहासात जे मानाचे स्थान संस्थापक राष्ट्र निर्माते म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन, बेंजामिन फ्रँकलिन, थॉमस जेफरसन, जॉन डम्स आणि अलेक्झांडर हॅमिल्टन यांना आहे तेच सर्वोच्च स्थान भारताच्या इतिहासात अनुक्रमे या पाच महनीय नेत्यांना दिले पाहिजे. थॉमस जेफरसन हे अमेरिकेच्या संविधानाचे निर्माते आहेत, तसे डॉ. आंबेडकर हे भारताच्या संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या संकल्पनेतील भारत हा एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही भारतीय संविधानाची गाभातत्त्वे (Cardinal tenetr) आहेत.

स्वातंत्र्य आंदोलनातील प्रमुख सहभागी कार्यकर्ते आणि दूरदृष्टीच्या नेत्यांना भारताच्या भाषिक, वंशिक,धर्मिक आणि सांस्कृतिक बहुलतेची (Plurality) पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे अशा सर्वच बाबतीत विविधता असलेल्या देशात कुठल्याही एका धर्माला विशेष प्राधान्य न देता सर्वांना समान हक्क व दर्जा देणे क्रमप्राप्त होते. १९१९ साली ब्रिटिश पार्लमेंटने भारतासाठी तयार केलेल्या संविधानिक कायद्यात याचा विचार केलेला नव्हता. यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करून ज्येष्ठ काँग्रेस नेते मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या संविधानाचे स्वरूप ठरविण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर झालेल्या तीन गोलमेज परिषदातुन भारतीय संविधान निर्मितीच्या दिशेने गंभीर विचार सुरू झाला. त्यानंतर १९३५ चा भारतीय कायदा, सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट मिशन आणि संविधान सभेची स्थापना ही भारताच्या संविधान निर्मितीचे ऐतिहासिक टप्पे आहेत. पुढे देशातील विविध संघटनांनी अनेक मसुदे/ आराखडे (ड्राफ्टस) संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सादर केले. दि. १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेली 'आठ उद्दिष्टे' यावर चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रजासत्ताक राष्ट्राचे सार्वभौमत्वाचा उद्गम लोकात असतो असे विधान करून प्रभावी मांडणी केली. संपूर्ण संविधान सभा डॉ.आंबेडकरांच्या भाषणाने प्रभावित झाली आणि मसुदा समितीच्या अध्यक्षपदी त्यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यानंतर दोन वर्ष, अकरा महिने, आणि सतरा दिवसांच्या अथक परिश्रमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्वात मोठे भारतीय संविधान तयार केले. संविधान सभेने हा अंतिम मसुदा दि.२६ नोव्हेंबर १९४९ साली स्वीकारला आणि दि.२६ जानेवारी १९५० पासून देशभर लागू केला. त्यामुळे तेच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार आणि संविधान निर्माते आहेत.डॉ. आंबेडकरांच्या या अतुलनीय, युगप्रवर्तक कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांच्या एकशे पंचविसाव्या जयंती वर्षापासून दरवर्षी २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून साजरा करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

भारतीय संविधानाची सुरूवात उद्देशिका (Preamble) ने होते आणि उद्देशिका-आम्ही, भारताचे लोक या महत्त्वपूर्ण शब्दांनी सुरू होते. याचा अर्थ भारतात 'जनता हीच सार्वभौम' आहे. यावरूनच भारताचे संविधान सर्व जनतेच्या हिताची रक्षा करणारे, त्यांना मध्यवर्ती स्थान देणारे आहे, हे सिध्द होते. जे देश धर्माधिष्ठित असतात त्या देशाचे संविधान ईश्वरी सत्तेस सर्वोच मानते. त्याची सुरुवात In the name of Almighty/ God/ Allaha अशा दैवी शक्तीच्या नावाने होते. त्यामुळे लोकांना, नागरिकांना दुय्यम स्थान देऊन धर्माला, काल्पनिक देवाला अनावश्यक महत्त्व प्राप्त होते. तसेच एका विशिष्ट धर्माला विशेष महत्त्व प्राप्त होऊन इतर धर्मियांना दुय्यम स्थान दिले जाते. सर्वांना समान हक्क, दर्जा, संधी मिळत नाही. वास्तविक पाहता लोकशाही राज्य हे धर्मनिरपेक्षच असते आणि असायलाच पाहिजे कारण त्यात सर्वांना सामावून घेतले जाते. सध्या भारताची डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे आमची लोकशाही कसोटीवर आहे. तत्वतः आमचा देश धर्मनिरपेक्ष आहे पण देशातील राजकारण जातीय आणि धर्मांध आहे. समता आणि सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट बरेच दूर आहे. आपल्या देशाची वाटचाल उलट्या दिशेने तर होत नाही ना? असा प्रश्न पडतो. जात- धर्म जाणिवा अत्यंत टोकदार झाल्या असून भारतीय समाजाचे असंख्य गटात स्तरीकरण झालेले आहे. 'था राजा तथा प्रज्ञा' या म्हणीप्रमाणे राजकीय नेते, उच्चशिक्षित प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी धर्मांधता व जातीयतेला खतपाणी घालत आहेत. वंचित, उपेक्षित, अल्पसंख्याक समाजघटकांच्या मनात आज असुरक्षिततेची भावना बळावत आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाहीची कायद्याचे राज्य (Rule of law) आणि कायद्यासमोरची समानता (Equality before law) ही दोन गाभातत्त्वे आहेत. सर्व नागरिकांनी कायद्याच्या चौकटीत सनदशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय ती यशस्वी होत नाही. पण घटनात्मक मार्गाने शासनच चालत नसल्यामुळे अराजकता वाढते. 'बळी तो कान पिळी' याचा पदोपदी प्रत्यय येतो. लोक रस्त्यावर येतात, मोर्चे काढतात आणि शासनाच्या विरूद्ध आक्रोश करतात. संसदीय लोकशाही अयशस्वी झाली आहे, असे लोकांना वाटते. ती यशस्वी व्हायची असेल तर शासनही सनदशीर मार्गानेच चालले पाहिजे. संसदीय लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी व्हायची असेल तर संविधानिक मूल्यांबरोबर सहिष्णुता, माणुसकी, उदारता, संवेदनशीलता आदी मूल्ये ही खऱ्या अर्थाने अंगीकारणे आवश्यक आहे.

संविधानाची पहिली ओळख...शाळेच्या पहिल्या पायरीवर!

प्राथमिक शिक्षणातून लोकशाही मूल्यांची पेरणी

पंडित पवळे
शिक्षणयोगी,नांदेड.

२६ नोव्हेंबर हा दिवस म्हणजे केवळ भारतीय संविधान दिन साजरा करण्याचा औपचारिक सोहळा नाही, तर भारतीय लोकशाहीच्या मूल्यांचा आत्मशोध घेण्याचा दिवस आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताने संविधानाचा स्वीकार केला आणि २६ जानेवारी १९५० पासून ते अंमलात आले. या संविधानाने प्रत्येक भारतीयाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची अमूल्य शिदोरी दिली. मात्र, या मूल्यांचे खरे संवर्धन न्यायालयात किंवा संसदेत होण्यापूर्वी शाळेच्या वर्गखोलीत होणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण संविधानाचा खरा वारसदार घडतो तो प्राथमिक शाळेच्या मातीत!

शाळा म्हणजे लोकशाहीची पहिली प्रयोगशाळा!

बालवय हे व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचे अत्यंत संवेदनशील वय असते. या वयात मुलांच्या मनावर उमटलेले संस्कार आयुष्यभर त्यांच्यासोबत राहतात.म्हणूनच प्राथमिक शाळा ही केवळ अक्षरओळख, अंकज्ञान आणि पाठ्यपुस्तकातील धडे शिकविणारी संस्था नसून ती माणूस घडविणारी आणि लोकशाहीची बीजे रुजविणारी संस्कारभूमी आहे.



वर्गात बसलेली विविध जाती-धर्मांची, आर्थिक परिस्थितीची, भाषा आणि संस्कृतीची मुले जेव्हा एकाच बाकावर बसतात, एकाच पाण्याच्या नळावर पाणी पितात, एकत्र खेळतात आणि एकमेकांच्या आनंद-दुःखात सहभागी होतात, तेव्हा नकळत भारतीय संविधानातील समतेचा धडा प्रत्यक्ष जगत असतात. या बालविश्वात भेदभावाला स्थान नसते. प्रत्येक मूल महत्त्वाचे असते, प्रत्येकाला शिकण्याचा अधिकार असतो आणि प्रत्येकाच्या स्वप्नांना समान आकाश असते, ही जाणीव निर्माण करणे म्हणजेच संविधान शिक्षणाची खरी सुरुवात होय. संविधानातील कलमे पाठ करणे म्हणजे संविधान समजणे नव्हे. तर त्यातील मूल्ये आपल्या वर्तनात उतरविणे म्हणजे संविधान जगणे होय. एखाद्या मुलाला जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीवरून कमी लेखले जात असेल, तर आपण समतेचा धडा शिकविण्यात अपयशी ठरत आहोत. मुलांच्या प्रश्नांना वाव नसेल, तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ अपुरा ठरतो. वर्गात केवळ शिक्षकांचेच म्हणणे अंतिम मानले जात असेल, तर लोकशाहीतील संवाद आणि विचार स्वातंत्र्याची प्रक्रिया खुंटते. म्हणून वर्गप्रतिनिधी निवडणूक, सामूहिक निर्णय प्रक्रिया, गटचर्चा, बालसभा, परस्पर सहकार्य, जबाबदारीचे वाटप आणि विविधतेचा सन्मान अशा उपक्रमांतून मुलांना लोकशाहीचा अनुभव देता येतो. शाळेतील प्रत्येक नियमामागील कारण समजावून सांगणे, मुलांचे म्हणणे ऐकून घेणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करणे, हीसुद्धा संविधानिक संस्कृतीचीच पायाभरणी आहे.

शिक्षक:संविधानिक संस्कारांचा शिल्पकार!

प्राथमिक शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा कर्मचारी नसतो, तर तो भावी नागरिकांच्या विचारविश्वाचा शिल्पकार असतो. शिक्षकाच्या बोलण्यातून, वागण्यातून, निर्णयातून आणि विद्यार्थ्यांशी असलेल्या व्यवहारातून संविधानाची मूल्ये मुलांपर्यंत पोहोचतात. शिक्षक स्वतः सर्वांशी समानतेने वागत असेल, दुर्बल विद्यार्थ्याला आधार देत असेल, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देत असेल आणि विद्यार्थ्यांच्या मतांचा आदर करत असेल, तर त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच संविधानाचा जिवंत पाठ बनते. शिक्षणाचा अधिकार (आरटीई), २००९ ने ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदेशीर अधिकार दिला.मात्र, केवळ शाळेत प्रवेश मिळणे पुरेसे नाही. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण, आनंददायी, भेदभावमुक्त आणि भयमुक्त शिक्षण मिळणे आवश्यक आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही मूल्याधिष्ठित, अनुभवाधारित आणि सर्वसमावेशक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. या सर्व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी संविधानाचा मूलभूत विचार असणे गरजेचे आहे. आज अनेक शाळांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, प्रभातफेरी, भाषणे, प्रश्नमंजुषा आणि विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. हे उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहेत.परंतु संविधान दिनाचा उत्साह केवळ एका दिवसापुरता मर्यादित राहता कामा नये. वर्षभराच्या शैक्षणिक प्रक्रियेत संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.शाळेच्या परिपाठात समतेचा विचार असावा, मध्यान्ह भोजनात सामाजिक समरसता असावी, खेळाच्या मैदानावर भेदभावविरहित सहभाग असावा, वर्गात मुलांच्या मतांना प्रतिष्ठा असावी आणि शाळेच्या व्यवस्थापनात पालकांचा सहभाग असावा. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांनी सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, बालविवाह, मुलींच्या शिक्षणातील अडथळे आणि जातीय भेदभाव यांविषयी मुलांमध्ये चिकित्सक व संवेदनशील दृष्टिकोन विकसित केला पाहिजे.

आपण डॉक्टर, अभियंते, अधिकारी, उद्योजक आणि राजकीय नेते घडविण्याची स्वप्ने पाहतो; परंतु त्यापूर्वी जबाबदार, संवेदनशील, विवेकशील आणि संविधाननिष्ठ नागरिक घडविण्याचे ध्येय स्वीकारले पाहिजे. कारण अधिकारांची जाणीव असलेली, कर्तव्यांची जपणूक करणारी आणि दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करणारी पिढीच सशक्त लोकशाहीचा आधार बनू शकते.भारतीय संविधानाने आपल्याला केवळ शासनव्यवस्था दिली नाही, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा सन्मान दिला आहे. या सन्मानाची जाणीव बालमनात रुजविण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षणावर आहे. म्हणूनच संविधानाची प्रस्तावना मुलांना केवळ वाचायला शिकवू नये, तर तिचा अर्थ त्यांच्या जगण्यात उतरवायला शिकवावा. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, संविधानाची प्रत प्रत्येक शाळेत असणे आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे संविधानाचा विचार प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात असणे! शाळेच्या प्रांगणात समतेची फुले फुलली, वर्गखोलीत बंधुतेचा सुगंध दरवळला आणि शिक्षकांच्या आचरणातून न्याय व स्वातंत्र्याचे संस्कार रुजले, तरच संविधान दिनाचा खरा गौरव होईल. कारण उद्याच्या लोकशाहीचा मजबूत पाया आजच्या प्राथमिक शाळेतच रचला जात आहे.संविधान वाचणारी पिढी सुशिक्षित होईल; पण संविधान जगणारी पिढीच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत भारत घडवेल!

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

कुंडलवाडीत जुन्या पोलीस ठाण्याच्या जागी पोलीस चौकी सुरु करा

पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांना नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांचे निवेदन

कुंडलवाडीप्रतिनिधी-नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी कुंडलवाडी येथे भेट दिली असता नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी श्री कुंडलेश्वर महादेवाची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी पोलीस अधीक्षक डॉ.रोहन यांच्या हस्ते श्री गणराया पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या भेटीदरम्यान कुंडलवाडी शहराच्या सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी विविध महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन पोलीस अधीक्षकांना सादर केले. शहरातील जुन्या पोलीस ठाण्याच्या जागेवर पोलीस चौकी सुरू करावी, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासाची व्यवस्था करावी तसेच कुंडलवाडी पोलीस ठाण्यातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. शहराची वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करता पोलीस यंत्रणा अधिक सक्षम असणे आवश्यक आहे. जुन्या पोलीस ठाण्याच्या ठिकाणी पोलीस चौकी सुरू झाल्यास शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होईल. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या



वाढविल्यास नागरिकांना अधिक तत्परतेने पोलीस सेवा उपलब्ध होईल, अशी भूमिका नगराध्यक्षा कोटलावार यांनी यावेळी मांडली.या निवेदनाची पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी सकारात्मक दखल घेतली. तसेच जुन्या पोलीस ठाण्याच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित माहिती जाणून घेतली. यावेळी शैलेश ऱ्याकावार यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

अवैध रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी पकडला



नांदेड/प्रतिनिधी-शहरातील वसरणी ते दुधडेअरी कमान या रस्त्यावर अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा टिप्पर बुधवारी नांदेड ग्रामीण पोलीसांनी पकडला आहे.

रेती तस्करांविरुध्द पोलीसांचे कारवाईचे सत्र सुरु असतांनाही अवैधरित्या रेती वाहतूक जोमाने सुरु आहे. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक अशोक जाधव व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी सापळा रचुन वसरणी ते दुधडेअरी रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा टिप्पर क्र.एमएच २६ सीटी-७९०९ वाहतूक करीत असतांना पकडला आहे. सदरील वाहनात पाच ब्रास रेती पोलीसांना आढळून आली. पोलीसांनी हायवा टिप्पर व रेती असा ४५ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात पंडित जळबा गिरे (वय ४३) रा.झरी याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विष्णू रणमले यांची जवानांच्या कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी

उमरखेड/प्रतिनिधी-देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या भारतीय सैनिकांच्या कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी करून सामाजिक कार्यकर्ते विष्णू विठ्ठल रणमले यांनी समाजापुढे एक आदर्श ठेवला आहे.

आपले कुटुंबीय सीमेवर देशरक्षणासाठी तैनात असताना त्यांच्या मागे असलेल्या कुटुंबियांना एकटेपणा जाणवू नये, त्यांच्या दिवाळीत आनंदाची भर पडावी या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपा यवतमाळ जिल्हा चिटणीस महेश काळेश्वरकर होते. यावेळी सैनिकांचे कुटुंबीय अजय सुनिता दत्ता चव्हाण, विजय सुनिता दत्ता चव्हाण, ओमकार साधना संदीप बिचेवार, गोविंद राजाराम पवार, गणेश वसंता उचेवाड, दीपक भिमराव घुगरे, सुमेध मधुकरराव काळबांडे, तथागत प्रकाश दवणे, चंद्रमणी प्रकाश दवणे, साहेबराव पवार सह आदी सैनिक कुटुंबीय उपस्थित होते तर कार्यक्रमाला किसनराव कोत्तेवार, रामेश्वर कोत्तेवार, प्रदीप ठाकूर, जय ठाकूर, मनीष रणमले, बाळू संगेवार, मधुकरराव बोनसले, बाळू संगेवार आदी प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात भाजपा यवतमाळ जिल्हा चिटणीस महेश काळेश्वरकर, ग्रामपंचायत सदस्य मधुकर काळबांडे यांनी आपले विचार मांडले. सैनिकांच्या त्यागामुळेच आपण सुरक्षितपणे सण साजरे करू शकतो, त्यांच्या कुटुंबियांची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कंधारच्या जुन्या ग्रामीण रुग्णालयात ओ.पी.डी.तात्काळ सुरु करा

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर यांची मागणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) तात्काळ सुरू करून रुग्णांची होणारी गैरसोय टाळावी, तसेच बाळंतवाडी येथील उपजिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी मागणी कंधार तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात बुधवार,दि.२५ नोव्हेंबर रोजी वैद्यकीय अधीक्षक डॉ.कदम यांना निवेदन देण्यात आले.

कंधार येथील ग्रामीण रुग्णालयाचे स्थलांतर बाळंतवाडी येथील नवीन उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आल्यामुळे शहरातील जुन्या ठिकाणी रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्यसेवा बंद झाल्याने मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नवीन उपजिल्हा रुग्णालय शहरापासून अंदाजे तीन किलोमीटर अंतरावर असल्याने रुग्णांना ये-जा करण्यासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. यासाठी साधारणतः १५० रुपये खर्च येत असून, गरीब व सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. गंभीर रुग्णांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात यावे; मात्र किरकोळ आजार असलेल्या रुग्णांची तपासणी व उपचार कंधार शहरातील जुन्या ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणीच करण्यात यावेत, अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. तसेच नवीन उपजिल्हा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर व आवश्यक तंत्रज्ञांची नियुक्ती करून रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर, शहराध्यक्ष सय्यद सलीम स.रहीम, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. राजेश गुट्टे, तालुका सचिव सुरेश कल्लाळीकर, जिल्हा सहसचिव रमेशसिंह ठाकूर, नगरसेवक सचिन बसवंते, सेवादलाचे शहराध्यक्ष के.पी.नवघरे, युवक काँग्रेसचे जिल्हा महासचिव शिवम पाटील कुरुळेकर, शेख मोहसीन शेख जिलानी, सोमेश्वर देवपुजे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. गुडमेवार तसेच पत्रकार बांधवांचीही उपस्थिती होती.

हदगावमध्ये बंगाली बोगस डॉक्टराविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात बेकायदेशीररीत्या वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टर विरुद्ध नागरिकांनी ऑनलाईन तक्रार केल्यानंतर पर्दाफाश केला आहे. शहरातील डॉ. टीकाकार यांच्या नागमाता दवाखान्यात एका बंगाली व्यक्तीकडून रुग्णांवर उपचार केले जात असल्याची ऑनलाइन तक्रार आरोग्य विभागाला प्राप्त झाली होती,

आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रदीप स्वामी यांनी पुढाकार घेतला. स्थानियआरोग्य विभागाच्या पथकाने संबंधित व्यक्तीच्या बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायाची खातरजमा करून प्रत्यक्ष कारवाई केली. त्यानंतर संबंधिताविरुद्ध हदगाव पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाई दरम्यान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, नरसिंगराव माहूरकर, सतीश छत्रे, साळवे अस्वजित, किरवले संतोष आदी उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण व अधिकृत नोंदणी नसलेल्या व्यक्तींकडून उपचार करून घेणे नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आरोग्य विभागाने अशा बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायाविरुद्ध कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. हदगाव शहरातील या कारवाईमुळे बोगस डॉक्टरांचे धाबे दणाणले असून शहरातील इतर बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायांवरही आरोग्य विभागाने लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

धर्माबादमध्ये मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर उत्साहात

धर्माबाद/प्रतिनिधी-जनसेवा हीच ईश्वर सेवा या सेवाभावी विचारातून लायन्स नेत्र रुग्णालय, नांदेड यांच्या वतीने धर्माबाद येथे २४ नोव्हेंबर रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात नागरिकांची नेत्रतपासणी करून गरजू रुग्णांना पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.शिबिराचे उद्घाटन डॉ. के. आर. काकाणी, डॉ. सौ. वीणा काकाणी आणि श्री. रोहन पोतगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी संजय कानगुले, राजकुमार पवार, ओमकार नरवाडे व सतीश गजभारे उपस्थित होते. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना मोफत नेत्रसेवा उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे दर महिन्याच्या २४ तारखेला धर्माबाद येथे याच ठिकाणी नियमित मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

होमगार्ड जवानांनी निष्ठापूर्वक प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडावे

अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-होमगार्ड जवान यांनी आपले कर्तव्य निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे पार पाडावे. असे आवाहन होमगार्डचे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांनी बुधवारी येथे बोलताना केले.

दि.१९ नोव्हेंबर पासून सुरू असलेल्या जिल्ह्यातील पुरुष होमगार्ड यांच्या उजळणी प्रशिक्षण शिबीरास भेट दिल्यानंतर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी केंद्र नायक संतोष जैस्वाल, समादेशक अधिकारी प्रकाश कांबळे,प्रमुख लिपिक अभिषेक देशमुख यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना संदीप जाधव म्हणाले की, पोलीस दलाला होमगार्ड यांचे नेहमी



सहकार्य लाभते. निष्काम सेवा हे ब्रीदवाक्य असलेल्या होमगार्ड जवानांचे चांगले काम आहे. आगामी काळात देखील सर्व होमगार्ड जवानांनी आपले काम निष्ठा पूर्वक प्रामाणिकपणे पार पाडावे. शिबिरातील होमगार्ड जवानांनी परेड कमांडर वरिष्ठ पलटन नायक बळवंत अटकोरे यांच्या नेतृत्वाखाली अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांना सशस्त्र मानवंदना दिल्यानंतर त्यांनी सर्व जवानांचे मुक्त कंठाने कौतुक केले तसेच आपल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी नेहमीच प्रयत्न करीन, अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली. सदर उजळणी प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी असलेल्या होमगार्ड जवानांना पदकवायत, लाठी कवायत, रायफल कवायत, प्रथमोपचार, अग्निशमन, पूर विमोचन, आपत्ती व्यवस्थापन आदींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. शिबीर काळात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक नेहा शिंदे यांनी होमगार्ड यांना वाहतुकीचे नियम, वाहतूक सुरक्षा आदी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

भाजप ग्रामविकास प्रकोष्ठच्या जिल्हा संयोजकपदी गजानन पाटील

हदगाव/प्रतिनिधी-शहरातील ज्येष्ठ पत्रकार गजानन पाटील यांची भाजपच्या ग्रामविकास प्रकोष्ठाच्या जिल्हा संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार तसेच सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे हदगाव विधानसभा क्षेत्रातील राजकीय वर्तुळातून गजानन पाटील यांचे अभिनंदन होत आहे.गजानन पाटील यांना पत्रकारितेतील तब्बल २८ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर त्यांनी ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शेतकरी आणि सामाजिक सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सातत्याने मांडले आहेत. ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या प्रशासन व शासन दरबारी पोहोचविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.आता भाजपच्या ग्रामविकास प्रकोष्ठाच्या जिल्हा संयोजकपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण विकासाच्या विविध योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे, ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर पक्ष संघटना अधिक मजबूत करणे, तसेच ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांना वाचा फोडून ते सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे गजानन पाटील यांनी सांगितले.

जाहीर प्रगटन

आर.पी.शिंदे,न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र.१,नांदेड यांचे न्यायालयात

ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१७२१/२०२६

मोहम्मद रफीख मोहम्मद इब्राहिम वि. आयुक्त

अर्जदार:- मोहम्मद रफीख मोहम्मद इब्राहिम, वय ५३ वर्ष, व्यवसाय-व्यापार, रा.हैदरबाग क्र.१, शरीफा मस्जीदजवळ,नांदेड ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : आयुक्त जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी,नां.वा.श. महानगरपालिका,नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार मोहम्मद रफीख मोहम्मद इब्राहिम, वय ५३ वर्ष, व्यवसाय-व्यापार, रा.हैदरबाग क्र.१, शरीफा मस्जीदजवळ, नांदेड, ता.जि.नांदेड यांचा स्वतःचा जन्म दिनांक १५.०१.१९७३ रोजी आईच्या राहत्या घरी इतवारा,नांदेड, ता.जि.नांदेड येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०७.०१.२०२७ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रगटन आज दिनांक २५/११/२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम श्रेणी,हिमायतनगर यांचे न्यायालयात

ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४८/२०२६

नवनाथ पि.साहेबराव तवर विरुध्द निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, २०२६ अंतर्गत अर्ज

अर्जदार:- नवनाथ पि.साहेबराव तवर वय-४१ वर्षे,धंदा-शेती रा.बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड

प्रकरण : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची मुलगी नामे रिद्धिका पि.नवनाथ तवर यांचा जन्म दि.१८/०७/२०११ रोजी मोजे बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार यांच्या कार्यालय ने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी,प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम श्रेणी,हिमायतनगर यांचे न्यायालयात

ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०९/२०२६

नवनाथ पि.साहेबराव तवर विरुध्द निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, २०२६ अंतर्गत अर्ज

अर्जदार:- नवनाथ पि.साहेबराव तवर वय-४१ वर्षे,धंदा-शेती रा.बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड

प्रकरण : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची मुलगी नामे सिद्धिका पि.नवनाथ तवर यांचा जन्म दि.१८/०७/२०११ रोजी मोजे बोरगाव पोस्ट आष्टी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार यांच्या कार्यालय ने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी,प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जार सेंटरमुळे साठ टक्के पाण्याची नासाडी;प्रशासनाचे दुर्लक्ष

देगलूर/प्रतिनिधी-एकीकडे पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असताना दुसरीकडे शहरातील खाजगी जार सेंटर मधून दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याची उधळपट्टी सुरू असल्याचा प्रकार समोर येत आहे. पाणी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत तब्बल ६० टक्के पाणी वाया जात असल्याचा दावा केला जात असून, हे पाणी कोणत्याही पुनर्वापरावे ना थेट गटारीत आणि मोकळ्या जागीच सोडले जात आहे. संभाव्य जल संकटाची संकट गडद होत असताना पाण्याच्या या बेसुमार नासाडीमुळे देगलूरकरामध्ये संताप व्यक्त



होत आहे.

शहरातील विविध भागात खाजगी जार सेंटरचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे. नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली या केंद्रामध्ये दररोज हजारो लिटर पाण्यावर प्रक्रिया केली जाते. मात्र, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात रिजेक्ट वॉटर बाहेर पडते हे पाणी पुन्हा वापरण्या ऐवजी थेट नाल्यांमध्ये सोडून दिले जाते. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे.विशेष म्हणजे, एका बाजूला शहरासह ग्रामीण भागात पाणीटंचाईची संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची नियोजन करण्याची वेळ येत असताना दुसरीकडे व्यावसायिक कारणासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा मोठा भाग वाया जात आहे. पाणीटंचाईच्या झळा सामान्य नागरिकांना सहन कराव्या लागणार आणि दुसरीकडे पाण्याचा अपव्यय सुरू राहणार, ही बाब संताप जनक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. जार सेंटरमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा वापर स्वच्छता, झाडांना पाणी देणे आणि इतर योग्य कामासाठी करता येऊ शकतो, त्यासाठी पुनर्वापराची व्यवस्था बंधनकारक करण्याबाबत प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा हा अपव्यय अधिक गंभीर ठरण्याची शक्यता आहे. जार सेंटरमध्ये पाणी शुद्धीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची, पाणी वापराची आणि बाहेर पडणाऱ्या पाण्याच्या पुनर्वापराची तपासणी होणे आवश्यक आहे. संबंधित केंद्राकडे आवश्यक परवानगी आहेत का, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे.

नायगाव पंचायत समितीच्या घरकुल विभागात पुन्हा संशयाचे वातावरण

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव पंचायत समितीच्या घरकुल विभागाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. घरकुल योजनेशी संबंधित अभियंत्यांशी संपर्क साधण्यासाठी फोन केला असता सर्वांचेच मोबाईल बंद असल्याचा प्रकार समोर येत आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या अडचणी मांडायच्या तरी कुणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी नायगाव पंचायत समितीच्या घरकुल विभागात आर्थिक व्यवहारांच्या तक्रारींमुळे मोठ्या प्रमाणात निलंबनाची कारवाई झाली होती. आ.राजेश पवार यांनी एका आमसभेत नागरिकांसमक्ष घरकुल विभागातील अभियंत्यांना जाब विचारला असता, पैसे घेतल्याशिवाय घरकुलाची बिले काढली जात नसल्याची कबुली अभियंत्यांकडून देण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही झाले होते. त्यानंतर संबंधित नऊ कर्मच्याऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.हा प्रकार शांत होत नाही तोच, घरकुलाची बिले काढण्यासाठी पैशांच्या व्यवहारासंदर्भातील दोन अभियंत्यांचे कथित कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या प्रकरणानंतर आणखी दोन अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.विशेष बाब म्हणजे, एका अभियंत्याकडे चार हजारांपेक्षाही कमी घरकुलांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट असताना, त्यातही कृत्रिम अडथळे निर्माण करून घरकुल लाभार्थ्यांना अडचणीत आणले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तपासणीचे उद्दिष्ट मर्यादित असतानाही लाभार्थ्यांची कामे वेळेत का होत नाहीत? तांत्रिक तपासणी आणि बिल प्रक्रियेत विलंब नेमका कशामुळे होतो, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात निलंबनाची कारवाई होऊनही घरकुल विभागाच्या कार्यपद्धतीत सुधारणा झाली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई, यशवंतराव चव्हाण ग्राम विकास व शिक्षण प्रसारक मंडळच्यावतीने २२ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन २०२६ निमित्त शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी प्रा.के.एस.पौळ, दिगंबर कदम, प्रा.होपळे, डॉ.वैजयंती कस्तुरे, प्रा.नितीन हाटकर, प्रल्हाद इंगोले यांच्यासह इतर उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

जि.प.कर्मचाऱ्यांचा हिवाळी अधिवेशनावर नागपूरात भव्य मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन (ओंकार प्रणित) ची राज्यस्तरीय ऑनलाईन बैठक राज्याध्यक्ष ॲड. बाबुराव पुजरवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रलंबित मागण्यांकडे शासन गांभीर्याने पाहत नसल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. येणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर नागपूर येथे भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मागण्या मान्य न झाल्यास काम बंद आंदोलन आणि असहकार आंदोलन करण्याचाही इशारा देण्यात आला. बैठकीत कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. कनिष्ठ सहाय्यक व वरिष्ठ सहाय्यक यांच्या पदोन्नतीस्तरा बाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या कामाच्या वाटपाबाबत मार्गदर्शक तत्त्वे काढावीत आणि त्यांना एस-१५ वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी आहे. सहाय्यक प्रशासन अधिकारी यांना वर्ग- राजपत्रित पदाचा दर्जा द्यावा, असेही ठरले. अनुकंपा तत्त्वावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ नियुक्ती द्यावी आणि नियुक्ती मिळालेल्यांना शैक्षणिक पात्रतेप्रमाणे पेनियुक्ती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. जिल्हा परिषदेत वाहनचालक, शिपाई यांची पूर्वीप्रमाणे भरती करावी, कंत्राटी पद्धत रद्द करावी, आकृतीबंधात कोणतीही पदे कमी करू नयेत, अशीही मागणी आहे. व इतर मागण्यांचा समावेश आहे. या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक बलराज मगर, सुनील जानोरकर, विजयकुमार हळदे, रामचंद्र मडके, सुभाष कराळे, अरविंद अंतुरकर, विजय तांदूळकर, सुरेश म्हात्रे, मेघराज निमसे, लेखा संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष प्रेमानंद तलवारे, संतोष मठपती, धनंजय गुम्मालवार, राघवेंद्र मदनूरकर, सचिन चौदंते, प्रशांत गायकवाड, बालाजी जामूतकर, रामेश्वर बेळगे यांच्यासह सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव व पदाधिकारी उपस्थित होते.

शिवैक्य हरिहरराव भोसीकर यांच्या समाधीवर २९ रोजी लिंगस्थापना सोहळा

कंधार/प्रतिनिधी-लोकनेते शिवैक्य हरिहरराव भोसीकर यांच्या समाधीवर रविवार, दि.२९ नोव्हेंबर रोजी भव्य लिंगस्थापना समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री श्री श्री १००८ केदारनाथ रावल जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी, केदार पीठ (उत्तराखंड) यांच्या शुभहस्ते तसेच विविध शिवाचार्यांच्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा संपन्न होणार आहे.

पानभोसी येथील भुमिपुत्र लोकनेते हरिहरराव भोसीकर यांच्या समाधीस्थळी हा



कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेला उजाळा देणाऱ्या या सोहळ्यास विविध भागांतील संत-महंत, शिवाचार्य, मान्यवर, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच भाविकांची उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने समाधीस्थळी लिंगस्थापना करण्यात येणार असून, जगद्गुरूंच्या शुभ हस्ते होणाऱ्या या विधीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रम रविवारी सकाळी ११ वाजता संपन्न होणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व आशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवकुमार हरिहरराव भोसीकर यांनी सर्व नागरिकांना केले आहे.

पंचशील विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज (गुरुवार) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनूले, संचालक जगदीश कदम, मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक अमररत्न वाढवे यांनी भारतीय संविधाना विषयी बोलताना सांगितले की,संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा लोकशाहीचा भक्कम आधार असल्याचे सविस्तर महत्व विशद केले. शाळेतील सहशिक्षिका श्रीमती सारिका बारसे आणि विद्यार्थ्यांनी सामूहिक संविधान वाचन केले.शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी



काढण्यात आली डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात असलेल्या संविधान प्रतिकृतीस संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले सोनूले, संचालक जगदीश कदम, मठाधिपती योगीराज बापू, मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील संविधान प्रतिकृती समोर संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. प्रभात फेरी शाळेत आल्यानंतर विद्यार्थी आणि शिक्षकांनी मानवी साखळी तयार करून भारतीय संविधानातील न्याय,स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्याचा संदेश दिला.

पान १ वरुन

खा.शरद पवार पुन्हा...

या बैठकीला प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, रोहित पवार, अनिल देशमुख यांच्यासह पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते आणि जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. मात्र, शरद पवार यांना रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळताच सुप्रिया सुळे यांनी बैठक अर्धवट सोडून ब्रीच कँडी रुग्णालय गाठले. तेथे त्यांनी डॉक्टरांची भेट घेऊन पवार यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. शरद पवार यांची यापूर्वी दिवाळीच्या काळात प्रकृती बिघडली होती.

तलाठ्यावर लोखंडी रॉडने हल्ला

बीड:बीड जिल्ह्यात अवैध वाळू उपशाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गेवराई तालुक्यातील आहेर चिंचोली येथे शासकीय कार्यालयात घुसून वाळूमाफियाने तलाठ्यावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विलास तपसे असे जखमी तलाठ्याचे नाव असून, त्यांच्यावर सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे महसूल प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील आहेर चिंचोली परिसरातील सिंदफणा नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशाविरोधात कारवाई करताना तलाठी विलास तपसे यांनी संबंधित व्यक्तीचे साहित्य जप्त केले होते.आरोपीने थेट कार्यालयात येवून लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा आरोप आहे.

कल्चरल असोसिएशनच्यावतीने दि.१२ व १३ डिसेंबर रोजी व्याख्यानमाला

नांदेड/प्रतिनिधी-कल्चरल असोसिएशन नांदेडच्या वतीने घेण्यात येणारी फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे व्याख्यानमाला दि. १२ आणि १३ डिसेंबर रोजी सायं.६.३० वा. स्व. पूर्णमलजी लाहोटी सभागृह, सायन्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित केली आहे. हे व्याख्यानमालेचे २४ वे वर्षे आहे.

शनिवार, दि. १२ डिसेंबर रोजी उद्घाटनाचे पुष्प ज्येष्ठ विचारवंत प्रा. जयदेव डोळे (छत्रपती संभाजीनगर) हे फुले विचाराची प्रासंगिगता या विषयाने व्याख्यानमालेला सुरूवात होईल. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत डॉ. प्रवीण पाटील, अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसाटी, प्रा. दत्ता भगत, संस्थापक अध्यक्ष, कल्चरल आसोसिएशन, यावेळी प्राचार्य अशोक नवसागरे स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.रविवार, दि. १३ डिसेंबर रोजी नागपूरच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या छाया खोब्रागडे यांच्या आंबेडकरी चळवळी पुढील आव्हाने आणि महिलांची भूमिका या विषयाने व्याख्यानमालेचा समारोप होणार आहे. तरी या व्याख्यानमालेचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. राजेंद्र गोणारकर, रामदास होटकर, डॉ. विजयकुमार माहुरे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पान १ वरुन

पुणे हल्ला प्रकरणी आरोपींना...

घटना घडल्याने कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी पत्रकार परिषदेत सरकारची भूमिका स्पष्ट केली. पुण्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि इतर तपशील पोलिसांकडून मागविण्यात आले आहेत. पुणे पोलिसांनी मकोका कायद्यांतर्गत केलेल्या कारवाईचाही त्यांनी उल्लेख केला.राज्यात काही गुन्हेगारी प्रवृत्ती स्वतःची दहशत निर्माण करून मोठे गुंड असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा प्रवृत्तींना वेळीच ठेचून काढण्याची गरज आहे. पोलिसांचा धाक काय असतो, हे गुन्हेगारांना दाखवून द्या, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. माहिम गोळीबारातील आरोपींचा शोध सुरू असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर कारवाई केली जाईल, असेही कदम यांनी स्पष्ट केले. पुणे आणि मुंबईतील घटनांमुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, गुन्हेगारी टोळ्यांवर नियंत्रण मिळविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

जिल्ह्यात २८ व २९ नोव्हेंबरला सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिर

नांदेड/प्रतिनिधी-भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न होऊ शकलेल्या पात्र मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव नोंदविण्याची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणजेच एएसडीडी प्रवर्गात नोंद झालेल्या मतदारांसाठी ही संधी देण्यात आली आहे.या मोहिमेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर शनिवार, दि. २८ व रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

महिलांप्रमाणेच पुरुष कर्मचाऱ्यांनाही पितृत्व रजा

तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांची महत्त्वपूर्ण घोषणा

चेन्नई: तामिळनाडू सरकारने पुरुष सरकारी कर्मचाऱ्यांसाठी १५ दिवसांची पितृत्व रजा (पॅटरनिटी लीव्ह) जाहीर केली आहे. मुख्यमंत्री विजय यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला असून, यामुळे नवजात बाळाच्या संगोपनात वडिलांनाही सहभागी होता येणार आहे.

या निर्णयानुसार, पुरुष कर्मचाऱ्यांना बाळाच्या जन्माच्या १५ दिवस आधी किंवा जन्मानंतर सहा महिन्यांच्या आत १५ दिवसांची रजा घेता येणार आहे. प्रसूतीच्या काळात आई आणि बाळाला शारीरिक व मानसिक आधार देण्यासाठी तसेच बाळाच्या संगोपनात वडिलांचा सहभाग वाढविण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले.दरम्यान, तामिळनाडूमध्ये महिला सरकारी कर्मचाऱ्यांना दिवसांची प्रसूती रजा दिली जाते. तिसऱ्या अपत्यासाठीही ही रजा लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पुरुष कर्मचाऱ्यांसाठी पितृत्व रजा सुरू करण्याच्या निर्णयामुळे कर्मचारी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

संविधानाच्या जयघोषात नांदेडमध्ये...

आजी-माजी सैनिक संघटना, पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक सहभागी झाले होते. यावेळी श्री हुजूर साहेब ब्लड सेंटर, नांदेड यांच्या वतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास समाजकल्याण विभागाचे समाजकल्याण अधिकारी गजानन नरवाडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त व्यक्ती व संस्थांचे प्रतिनिधी, अधिवक्ता इम्रान खान, विजय सुवर्णकार, एल. ए. हिरे, सुनील केंद्रे, ए. एस. पंडित, कैलास मोरे, लक्ष्मी गायके, पंडित खानसोळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४